# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३०५ - २३ दिनांक : - ०९/०९/२०२३

## ५ लाख ८० हजार रुपये किंमतीचे ब्राऊन शुगर या अंमली पदार्थासह परराज्यातील आरोपींना अटक विरार पोलीस ठाणेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगीरी.

विरार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र कांबळे यांनी मागील ३ महिने पासून विरार पो ठाणे मध्ये दारुबंदी व अंमली पदार्थ विरोधी पथक निर्माण केले असून त्यामध्ये पो.उप निरी श्री संजय भोराडे, पो.हवा. विजय सूर्यवंशी, पो.शि. चेतन अशोक निंबाळकर, इंद्रसिंग पाडवी, मसुब. ऋषिकेश गवळी असे कार्यरत आहेत.

दिनांक – ८/९/२०२३ रोजी सदर पथकास साईनाथ नाका विरार पूर्व या ठिकाणी दोन इसम अंमली पदार्थ घेवून विक्री करीता येणार आहेत, अशी गुप्त बातमीदार यांचे मार्फत माहिती मिळाल्याने सदर बातमी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेद्र कांबळे सर यांना कळवून त्याचे आदेशान्वये पोलीस निरीक्षक श्री अभिजीत मडके सर यांना पुढील छापा करावाई करणे बाबत आदेशित झाल्याने मा.सहा पोलीस आयुक्त सो, विरार विभाग यांचे पूर्व परवानगीने छापा कारवाई करण्यात आली. सदर कारवाईमध्ये १) श्री नेपाल दुल्ले सिंग वय- ५० वर्षे धंदा- शेती, रा ग्राम- जिजनी पोस्ट नाहारगठठा ता.पांचपाढ जि.जाहालावाड राज्य राजस्थान २) मो.अशपाक अब्दुल गफार वय- ४० वर्षे धंदा- कापड विक्री रा. गोंदी कोटा पोस्ट मंडीगेट ता लाडफुरा जि कोटा राजस्थान राज्य असे मिळून आल्याने त्यांच्याकडे **५८ ग्रॅम अंमली पदार्थ ब्राऊन शुगर ( गर्दा ) ५,८०,०००/- ( ५ लाख ८० हजार रुपयाचा) माल मिळुन आल्याने तो जप्त करुन सदर आरोपीतांवर** विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ८६८/२०२३ **अंमली पदार्थ औषधे आणि मनोवैज्ञानिक पदार्थ अधिनियम १९८५ (एन.डी.पी.एस. ॲक्ट) कलम ८ (क),२१ (ब) २० (ब)ii (ब ) प्रमाणे. गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.**

**सदर पथकाने यापुर्वीही खालीलप्रमाणे कारवाई केलेली आहे.**

१) विरार पोलीस ठाणे दारुबंदी व अंमली पदार्थ विरोधी पथकाने गुन्हा रजि नंबर ८५७/२०२३ **अंमली पदार्थ औषधे आणि मनोवैज्ञानिक पदार्थ अधिनियम १९८५ (एन.डी.पी.एस. ॲक्ट) कलम ८ (क),२१ (ब) २० (ब)ii (ब ) प्रमाणे.दिनाक ३/९/२०२३ रोजी गुन्हा दाखल करुन १२ ग्रॅम अंमली पदार्थ ब्राऊन शुगर ( गर्दा ) ८२,०००/- माल जप्त केला होता.**

२) अंमली पदार्थ गांजा पिणारे इसमांचे वर **अंमली पदार्थ औषधे आणि मनोवैज्ञानिक पदार्थ अधिनियम १९८५ (एन.डी.पी.एस. ॲक्ट) अन्वये विरार पो ठाणे हददीतील ३० इसमांचेवर कारवाई करुन मा. वसई न्यायालयाने प्रत्येकी १०,०००/- रुपये प्रमाणे आता पावेतो ३,००,०००/- ( अक्षरी तीन लाख ) रुपये दंड ठोठावला आहे.**

**३) विरार पो ठाणे हददीत आता पावेतो पथकाने मुंबई दारुबंदी अधिनियमा प्रमाणे विविध ठिकाणी रेड करुन २९ केसेस रजिस्ट्रर करुन ७,००,०००/- ( अक्षरी सात लाख ) रुपयाचा मुददेमाल –दारु बनविण्याचे लोखंडी ड्रम,**

**दारु बनविणे करीता आवश्यक असणारा गुळ, साखर, नवसागर व इतर असा मुददेमाल हा जागीच नष्ट केला आहे.**

**४) विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ७८८/२०२३ अंमली पदार्थ औषधे आणि मनोवैज्ञानिक पदार्थ अधिनियम १९८५ (एन.डी.पी.एस. ॲक्ट) कलम ८ (क),२१ (ब) प्रमाणे दाखल करुन ८५० ग्रॅम वजनाचा १२८९५/- रुपये किंमतीचा अंमली पदार्थ गांजा हा जप्त करण्यात आला होता.**

**५) विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ८०४/२०२३ अंमली पदार्थ औषधे आणि मनोवैज्ञानिक पदार्थ अधिनियम १९८५ (एन.डी.पी.एस. ॲक्ट) कलम ८ (क),२१ (ब) प्रमाणे दाखल करुन ५०० ग्रॅम वजनाचा १०,०००/- रुपये किंमतीचा अंमली पदार्थ गांजा हा जप्त करण्यात आला होता.**

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, श्री.अभिजित मडके, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पो.उप निरी श्री संजय भोराडे, पो.हवा. विजय सूर्यवंशी, पो.शि. चेतन अशोक निंबाळकर, इंद्रसिंग पाडवी, मसुब. ऋषिकेश गवळी यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

